REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# सरंजामी वास्तु कला व त्यांचे बांधकाम तंत्र

**प्रा. डॉ. डी. एस. बिराजदार**
**इतिहास विभाग प्रमुख, श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, जि. उस्माााबाद .**

**प्रास्तावना :-**

निवारा ही मानवाची प्राथमिक गरज आहे. इतकेच नव्हे ही सर्व प्राणीमात्राची भावना असते. मानवाने प्रारंभीच्या काळात ऊन, वारा, पाऊस यापासून आणि हिंस्त्र पशूपासूनही स्वरंक्षण मिळविण्यासाठी नैसर्गिक निवाऱ्याचा आश्रय घेतला (गुहा वगैरेचा). मानवी जीवनाचा संस्कृतिक इतिहास पहात असताना, अनादी काळापासून त्यांच्या जडणघडणीत अनेक उत्क्रांत अवस्था पहायला मिळतात. त्याने स्वतःच निवाऱ्याचे ठिकाण स्वप्रयत्नाने निर्माण करायला सुरूवात केली, याच्या वेद, पुराणे, व इतर ग्रंथातील नोंदीही खूप प्राचीन आहेत.[i] सुरुवातीला मनुष्याने भटके जीवन संपवून शेती करण्यास आणि अन्नधान्य पिकविण्यास सुरुवात केली. यातूनच त्याच्या जीवनाला स्थैर्य मिळाले व त्यामुळे समाजाची निर्मिती झाली. समाजात शांतता व सुव्यवस्था रहावी या गरजेतून राज्यसंस्था उदयास आल्या, याबरोबरच आपापसातील संघर्षाला सुरुवात झाली. यातूनच स्वसंरक्षण, समाजाच्या जीवीत आणि मालमत्तेच्या रक्षणाची, हिंस्त्रपशूपासून सर्वांचे संरक्षण व्हावे या गरजेतून संरक्षित वसाहती, तटबंदीयुक्त नगरे, बंदिस्त गढ्या व किल्ले बांधले जाऊ लागले. नैसर्गिक आडोशा ऐवजी स्वतःस अनुकुल अशा ठिकाणी 'वास्तू' बांधण्यात येऊ लागल्या.

प्रासादादीनी कर्माणी वस्तुत्वाद्वस्तु संश्रयाद ।।
वस्तुभिनिर्मितत्वाच्च वास्तुनीती स्मृतानि च ।। मयमत.

घरे, राजवाडे वगैरे कामे राहण्याच्या जागा, वस्तू (जिन्नस) ठेवण्याच्या जागा, तसेच वस्तूच्या (पदार्थाच्या) बनविलेल्या गोष्टी म्हणून त्यांना 'वास्तू' वस्तूपासून निर्मित असे नाव आहे.[ii] 'वास्तू' हा शब्द 'वस्तू' पासून बनलेले अशा अर्थाचा आहे व वास्तू शब्द वस् रहाणे यापासून रहाण्याचे ठिकाण अशा अर्थाचा आहे. अशा वास्तूमध्ये विविध प्रकारच्या बांधकामाचा समावेश केला जातो.घरे,बंगले, हवेल्या, गढी, वाडे, किल्ले,राजवाडे (प्रासाद) इत्यादी सर्वप्रकारच्याधार्मिक व अधार्मिकइमारतीयामध्ये समाविष्टहोतात. मानवाला तिच्यापासून आसरा देणारी जागा इतकाच वास्तू शब्दाचा अर्थ आहे.

प्राचीन काळापासून त्या त्या कालखंडात निर्माण झालेल्या वास्तूरचनेत तत्कालिन धार्मिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिणामाचे प्रतिबिंब दिसून येत असते. म्हणूनच या 'वास्तू' म्हणजे समकालीन समाजाच्या संस्कृतिचे मूर्त प्रतिबिंब असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. तत्कालीन समाज जाणीवा (गरजा), कला जाणीव आणि वास्तुशास्त्रातील प्रगतीच्या खुणा त्या काळातील वास्तूरचनेत दिसून येतात.ऋग्वेदात (२.४१.५) एक हजार खांबी स्थानकाचा उल्लेख असून ऋग्वेद (६.४६.९) मध्ये तीन मजलीइमारतीचे वर्णन आढळते. महाभारत काळात तर स्थापत्य कला इतकी प्रगत झाली होती की "मया" सारखे स्थापत्यकला विशारद (इंजिनिअर्स) इमारत बांधण्यात कुशल होते. तसेच रामायणात (आयोध्याकाण्ड ३.१७, १८, ३२, ३७ व सुंदर काण्ड ६.) दशरथ व रावण यांच्या राजवाड्याचे उत्तम वर्णन करण्यात आले आहे.पुराणातूनही स्थापत्यकले विषयी माहिती मिळते.[iii] मौर्य काळात सत्ता विस्तारासाठी संघर्ष आणि या सत्ता संघर्षाचा परिणाम म्हणून दुर्ग स्थापत्याला महत्व प्राप्त झाले. याचे उल्लेख तत्कालीन वाङ्‌मयात आढळून येतात. कौटिलिय अर्थशास्त्रात[iv] व मेगॅस्थेनीजच्या इंडिका ग्रंथात त्या काळातील दुर्गाचे व राजवाड्याचे वर्णन आढळतात. ओरिसातील भुवनेश्वर जवळचे शिशुनपालगड येथून जवळच धौली येथेअशोकाचा प्रस्तर लेख व खंडगिर येथे खारवेलचा शिलालेख आहे.[v] शिशुनपालगडचे अवशेष हे धौलीच्या प्रस्तर लेखात उल्लेखिलेल्या तोसलीचे असावेत असे काहींचे मत आहे. तर कहीना ते खारवेलच्या लेखात उल्लेखिलेल्या कलिंग नगरीचे असावेत असे मत मांडले आहे. येथील उत्खननात नगराभोवती भक्कम तटबंदी आणि दगडी भव्य प्रवेशद्वारे उभारण्यात आली होती.



'प्रमाणमंजरी' या प्रसिध्द ग्रंथात वास्तूतील रचनेसाठी आणि तिच्या शोभनासाठी काष्ठशिल्पाचा वापर कसा करावा याची माहिती दिलेली आहे. एकंदरीत वास्तुशास्त्र, शिल्पशास्त्र, स्थापत्यशास्त्र यांची परंपरा आपल्या देशात फार प्राचीन असल्याचे तत्कालीन वाङ्‌मयातून दिसून येते. परंतु या संकल्पनाचा शास्त्रीय ग्रंथातून उपयोजीत अविष्कार

वास्तूमंडलाची भूमितीच्या परिभाषेत आकृती काढून बांधकामाच्या पूर्वतयारीच्या वेळी पूजा करण्याचे संकेत साकारु लागल्यापासून झाला असे म्हणता येईल.[vi]

मत्स्यपुराणात शिल्पावरील एकदंर अठरा संहिता आहेत असे सांगितले आहे. यापैकी भृगु, कश्यप, मयमत व विश्वकर्म अशा चार संहिता पाहण्यात आहेत. त्यावरुन त्या निरनिराळ्या प्रदेशाच्या परिस्थितीस अनुकुल असाव्यात.वास्तू निर्मितीच्या बाबतीत बांधकामाला शुभाशुभ मुहुर्त कोणता, जागा कोणत्या, त्या जागेवरील अतिमानुषी शक्तींना खूष कसे करावे इथपासून ते स्थपती व मापनपध्दतीच्या निवडीपर्यंतच्या बाबी येतात. नगररचनेत दुर्गरचनेस महत्वाचे स्थान आहे.

वास्तु मालकाच्या सांपतिक ऐपतीनुसार त्याची बांधणी होत असल्यामुळे त्याचे आकार लहानमोठे आढळत असे. सामान्यतः दोन चौक असलेल्या वास्तूपासून सात चौकापर्यंतचे आणि एक/दोन मजल्यांपासून सात मजल्यांचे (शनिवारवाडा, पुणे) वाडे उत्तर मध्ययुगीन काळात आढळतात. मुळात वाडा ही वास्तूरचनेतील संकल्पना भारतात फार प्राचीन काळी अस्तित्वात होती. तिचा उल्लेख प्राचीन संस्कृत वाङःमयात (बाणभट्टाची कादंबरी) आणि विशेषतः वास्तुशिल्पशास्त्रावरील मध्ययुगीन ग्रंथात (समरांगणसूत्रधार) आढळतो, पण मध्ययुगीन काळात वाडा या वास्तुप्रकाराला अधिक महत्त्व प्राप्त झाले. पेशवे, त्यांचे आप्तेष्ट, सरदार, सावकार, आश्रित यांनी पुणे, नाशिक, सासवड, सातारा, वाई, माहुली वगैरे ठिकाणी वाडे बांधले. तसेच मराठे ज्या ठिकाणी राजकीय हेतूने स्थायिक झाले वा स्थिरावले, अशा ठिकाणी उदा. तंजावर, बागलकोट, ग्वाल्हेर, इंदौर, माहेश्वर, बडोदे येथे त्यांनी वाडे बांधले. त्याप्रमाणेच मराठवाड्यातील निजामाचे सरदार, दरकदार, जहागीरदार वतनदार मंडळीनीही गढी/वाडे बांधलेले दिसून येतात. या काळातीलगढी/वाडे हा एक स्वतंत्र वास्तूविषय आहे. कारण कार्यानुरुप आकारनिर्मिती, भक्कम पाया व इमारतबांधणी, सुक्ष्म कलाकुसर, कार्यानुरुप नियोजन इत्यादी वैशिष्ट्ये त्यात दिसून येतात.

सामान्यतः गढी/वाडे हे तत्कालीन समाजातीले उच्चभ्रू सरदार, सरंजामदार, सावकार इत्यादींनी बांधलेले आहेत. त्यामुळे मध्ययुगीन काळात गढी/वाडा हा निवासस्थान, कार्यालय आणि अन्य दैनंदिन व्यवहारासाठी वापरला जाई. साहजिकच त्यांचे दर्शनी स्वरुप संरक्षणाच्या दृष्टिने भक्कम असे. त्यामुळे त्यांच्यासभोवती अनेकदा भक्कम दगडी वा मातीची संरक्षक भिंत बांधण्यात येई.गढी/वाड्यांचे दरवाजे मोठे असत व त्याला दिंडी दरवाजा असे. दरवाजावर व दिंडी दरवाजावर गणेशपट्टी असावयाची. गणेशपट्टीवर काही ठिकाणी कलश, तर काही ठिकाणी गणपती व कडेने वेलपत्री कोरलेली असे. गढी/वाड्याचा दरवाजा शक्यतो पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख असे. साधरणतः प्रत्येक वाड्याला देवडी अथवा सदर असे व नंतर पहिला चौक, चौकात कारंजी वा हौद, नंतर मुख्य गढी/वाड्याचे जोते. ते साधारणःसव्वा मीटर ते दीड मीटर उंच असे त्यानंतर ओसरी, माजघर, स्वयंपाकघर ही इतर दालने क्रमाने येत. दिवाणखाना पहिल्या मजल्यावर असे, दिवाणखान्यात स्त्रियांची उठण्या-बसण्याची स्वतंत्र्य व्यवस्था केलेली असे. त्यांच्यासाठी जीने ही वेगळे असत. भिंती रुंद म्हणजे दीड-दोन मीटरच्या असत. त्यामुळे बहुतेक जीने भिंतीतअसत. जामदारखाना स्वतंत्र असे किंवा एखाद्या खोलीतच भिंतीची रुंदी पाहून त्यात जडजवाहीर ठेवण्याच्या दृष्टीने सोय केलेली असे. दिवाणखाना,महालातील भिंतीवर,ओसरीवर,मुख्य भिंतीवर,चौकात आदी ठीकाणी सुशोभनासाठी पौरणिक प्रसंगांवरील चित्रे काढाण्याची सर्रास पद्धती होती. तत्कपोशी नक्षीकाम करण्याची पद्धत होती,ही नक्षी लाखेने चिकटविलेली असे. रसिकतेनुसार दिवाणखान्यांतूनही कारंजी असत. तावदानांना रंगीत काचा वापरीतहंड्या-झुंबरांची खूपच आवड होती. दिवाणखान्यात हंड्या-झुंबरे हमखास लावली जात असत. ती बाहेरच्या देशातून मागविलेली असत. दिवाणखान्यातील अलंकरणाचे महत्त्वाचे घटक म्हणजे पर्णांकित रचनाबंध असलेली चन्द्रकोरीझालरयुक्त महिरपी नक्षीदार कमान व त्या कमानीच्या बाजूंस सुरुचे नक्षीदार कोरीव स्तंभ असत. भारतात ही अलंकरणाची संकल्पना व प्रतिमान प्रथम मोगल काळात शहाजहान बादशहाच्या वेळी (काळ : १६०६-१६५८) प्रचारात आली. पुढे पेशव्यांच्या काळात राजस्थानातील कलेचाप्रभाव पडला. अठराव्या शतकात मराठ्यांचा माळवा व राजस्थानात संचार आणि संबध वाढला,त्याप्रमाणे निजामी राजवटीत मराठवाड्याच्या भागात ते प्रतिमान देवाणघेवाणीतून येथील वास्तुशैलीत प्रविष्ट झाले. पुढे राजस्थानातून गवंडी, कारागीर, कलाकार महाराष्ट्रात आल्यामुळे सरदार, जहागीरदारंच्या प्रासादात ते प्रतिमान प्रकर्षाने दिसू लागले. परिणामतः ही प्रतिमाने उच्चभ्रु लोकांच्या वाड्यातून सरसकट वापरात येऊ लागली. लाकडावर कोरीव काम करणारे कारागीर बहुधा कर्नाटकातील कारवारमधून आणले जात. एक खण साधारणतः दीड मीटरचा असे. मोठ्या वाड्यातील दालने पाचखणी, सातखणी अशी असत. ऐनाचे व सागवानी लाकूड वापरीत, ते टणक व कीड न लागणारे आणि विशेष म्हणजे पाण्याने सहजासहजी न कुजणारे व मुबलक उपलब्ध होते. बांधकाम मुख्यतः भार ग्रहणक्षम (लोड बेअरिंग) अशाप्रकारांनी केले जाई. लाकडी स्तंभ व खांब उभारताना वाळवी वगैरे प्रकारची कीड लागू नये म्हणून त्याचा तळखडा दगडी बनवून घेत. खांब जात्यात खुंटा बसवावा त्या पध्दतीने चौकोनी वा गोल तासलेल्या दगडात बसवीत असत. दोन तुळयांमध्ये जोडणाऱ्या कड्या साधारपणे ५ ते ९ सें.मी. रुंद असत. काही ठिकाणी १३ सें.मी. रुंद आढळतात. त्यावर माती टाकून जमीन करीत. दिवाणखाना दुघई किंवा तिघई असे कारण सुरुचे नक्षीदार खांब टाकून खोलीची रुंदी वाढविलेली असे. तसेच खिडक्यावरही महिरपदार नक्षीकाम हे त्या काळातील वास्तुशिल्पाचा उत्तम नमुना व वैशिष्ट्य होय. बांधकामासाठी मातीत चुना, गवत, गूळ मळवून कुजवीत आणि आवश्यकतेनुसार त्यात राळ, साबुदाणा, डिंक, सरस वगैरे चिकटपणासाठी घालीत असत. अनेकदा घोटलेल्या भिंतीवर संदलासदृश्य चुन्याचा किंचितसा थर देत. त्यामुळे अशा भिंतींना भेगा व चिरा सहसा पडत नसत. त्यामुळे चित्रीकरणास त्या सुलभ होत. गवत मातीला धरुन ठेवते म्हणून ते वापरीत असत. शिशाचा उपयोग मुख्यत्वे वास्तूच्या पायात करीत. घोटीव दगडाच्या भिंती बांधताना त्यांतील सांधे धट्ट व पक्के होण्यासाठी, सांधण्यासाठी शिशाचा रस ओतीत असत. उजेडासाठी हंड्यांखेरीज मोठ्या समयांचा उपयोग करीत.

**सारांश :-**

स्वसंरक्षण, समाजाच्या जीवीत आणि मालमत्तेच्या रक्षणाची, हिंस्त्रपशूपासून सर्वांचे संरक्षण व्हावे या गरजेतून नैसर्गिक आडोशा ऐवजी स्वत:स अनुकुल अशा ठिकाणी 'वास्तू' बांधण्यात येऊ लागल्या. वास्तुची बांधणी मालकाच्या सांपतिक ऐपतीनुसार होत असल्यामुळे त्याचे आकार लहानमोठे असत. दरवाजा शक्यतो पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख असे. या वास्तू म्हणजे निवासस्थानासाठी बांधलेल्या असल्याने वास्तुशास्त्रीय विचार केलेला आहे. यामुळेच बहुतांश वास्तुचे प्रवेशद्वार शक्यतो पूर्वाभिमुख किंवा उतराभिमुख असत. याला काही अपवाद पश्चिमाभिमुख असत. बांधकाम मुख्यत: चौकट संरचनात्मक व भार ग्रहणक्षम (लोड बेअरिंग) दोन्ही प्रकारांनी केलेली आहेत. खिडक्या महिरपदार नक्षीकाम असलेल्या असत. मेघडंबरी हा त्या काळातील वास्तूशिल्पाचा उत्तम नमूना व वैशिष्ट्ये होय. वास्तुच्या पायात व घोटीव दगडांच्या भिंती बांधताना त्यांतील सांधे घट्ट व पक्के होण्यासाठी शिशाचा रस ओतीत असत. जेणे करुन संरक्षणाच्या दृष्टिने त्यांना भक्कमपणा व मजबूती येते.

गतकालीन वैभवाचे व आपल्या सांस्कृतीक आणि ऐतिहासिक वारशांचे साक्षीदार काळाच्या ओघात नष्ट होत चालले आहेत. अशा आपल्या सांस्कृतीक व ऐतिहासिक वास्तुचे जतन व्हावे.

**संदर्भ सूची :-**

[१] *आपटे प्र.पां. : प्राचीन वास्तूशास्त्रीय संकल्पना आणि आधुनिक संदर्भ' भारत इतिहास संस्कृती मंडळ त्रैमासिक अंक ६३:२, ऑक्टोबर, १९८४, पृ. क्र. ७१.*

[२] *वझे कृ. वि. : हिंदी शिल्पशास्त्र, भाग - १, भा. इ. सं. म. पुरस्कृत ग्रंथमाला क्र.५ वा लोहभांडारम्, रविवार पुणे, १९२८, पृ. क्र. १३.*

[३] *तवकर ना. गो. : प्राचीन भारतीयांची ज्ञानसाधना, तवकर प्रकाशन, मुंबई, १९७३, पृ. क्र. ८४, ८५.*

[४] *बेंद्रे वा. सी. : गड - कोट - दुर्ग आणि त्यांची वास्तु, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन, मुंबई, १९६५, (परिशिष्ट ३ रे) पृ. क्र. १०३ ते १०७.*

[५] *देव शां. भा. : पुरातत्व विद्या, पृ. क्र. २०७.*

[६] *माटे म. श्री. : वास्तुशास्त्र आणि वास्तुश्लिप, पृ. क्र. ७१.*